महाराष्ट्र शासन

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर

टेलिफोन नं-०२३१-२६४१५८३
ईमेल- storercsmgmck@gmail.com
फॅक्स नं.०२३१-२६४४३६९
वेबसाईट - www.rcsmgmc.ac.in

जा.क्र/राछशामशावैमवछप्रासरुको/आस्था ४/सरळसेवा पदभरती/गट ड/४८९८/२०२४ दिनांक १९/१२/२०२४

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय ,कोल्हापूर या संस्थांमधील वर्ग) ४- गट-ड (संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबतची जाहिरात

## शुध्दीपत्रक

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापुर या संस्थांकडील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत दिनांक ११/१०/२०२४ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून सदर जाहिरातीमध्ये या शुध्दीपत्रकान्वये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१) प्रयोगशाळा परिचर, (महाविद्यालय) व प्रयोगशाळा परिचर (रुग्णालय) या दोन्ही पदांची वेतनश्रेणी मूळ जाहिरातीमध्ये अनवधानाने (एस -६, १९९०० - ६३२००) अशी दर्शविणेत आलेली आहे. तरी त्याऐवजी प्रयोगशाळा परिचर या पदाची वेतनश्रेणी (एस -१, १५००० - ४७६००) अशी समजण्यात / वाचण्यात यावी.

२) मूळ जाहिरातीमध्ये प्रयोगशाळा परिचर, (महाविद्यालय) या पदाकरिता सरळसेवा भरतीकरिता उपलब्ध ०८ दर्शविणेत आलेली होती, त्याएवेजी सदरच्या पदसंख्येत बदल करुन सरळसेवा पदभरतीकरिता उपलब्ध पदसंख्या ०१ दर्शविणेत येत आहे. सदर ०१ पदाचे आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

कृ.मा.पृ.

पदांचे नाव- प्रयोगशाळा परिचर (महाविद्यालय)

| सामाजिक आरक्षण | एकुण | महिला ३० % | माजी सैनिक १५ % | खेळाडू ५ % | प्रकल्पग्रस्त ५ % | भुकंपग्रस्त २ % | पदविधर अंश कालीन १०% | अनाथ १ % | सर्व साधारण | दिव्यांग ४% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.जा. १३% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | |
| अ.ज. ७% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | |
| वि.जा.अ. ३% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | |
| भ.ज. (ब)२.५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | |
| भ.ज. (क)३.५% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | |
| भ.ज. (ड) २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| वि.मा.प्र. २% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | |
| इ.मा.व. १९% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | |
| एस.ई.बी.सी. १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | |
| ई.डब्ल्यु.एस. १०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | | ० | |
| अराखीव २८% | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ | |
| एकुण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |

३) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील तरतूदीनूसार तसेच शासनाने याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले अन्य कोणतेही नियम, आदेश, कोणतेही अनुदेश यानूसार उमेदवाराने नियुक्तीच्या वेळी विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहिल. विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित उमेदवारास नियुक्तीकरिता अपात्र करण्यात येईल. या नियमातील व्याख्येनूसार लहान कुटूंब याचा अर्थ दोन अपत्ये यांसह पत्नी व पती असा आहे. याबाबत शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २८ मार्च, २००५ प्रमाणे तरतूदी लागू राहतील.

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक मकसि-१००७/प्र.क्र.३६/का.३६ दि.१०/०७/२००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर संबंधित पदांच्या सेवेभरती नियमातील सर्व अटींची पूर्तता ते करीत असल्यास त्यांना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील पदांवर नियुक्तीसाठी अर्ज करण्यास व त्यांची गूणानुक्रमे निवड होत असल्यास महाराष्ट्र सेवेतील पदांवर नेमणूकीस ते उमेदवार पात्र राहतील. सदर उमेदवारांनी सेवाप्रवेश नियमातील इतर सर्व अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहिल. तसेच संबंधित मराठी भाषिक उमेदवारांनी ते महाराष्ट्र शासनाने दावा केलेल्या ८६५

गावातीलच रहिवाशी असल्याबाबतचा त्यांच्या वास्तव्याचा सक्षम प्राधिका-याचा विहीत नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहिल. (महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गावांची यादी सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक मकसि-१००७/प्र.क्र.३६/का.३६ दि.१०/०७/२००८ मध्ये नमूद करण्यात आलेली आहे. उमेदवारांनी सदर शासन परिपत्रकाचे अवलोकन करावे.)

५) वरील बदल वगळता मूळ जाहिरातीमध्ये कोणत्याही भागात बदल करण्यात आलेले नाहीत. काही बदल असल्यास पुनश्च शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येईल. तसेच जाहिरातीचे सुधारित वेळापत्रक तसेच उमेदवारांना अर्ज भरण्याकरिता Online Link प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात येईल तसेच वृत्तपत्राद्वारे प्रसिध्द करण्यात येईल. तसेच www.rcsmgmc.ac.in व kolhapur.gov.in या संकेतस्थळांवरुन प्रसिध्द करण्यात येईल.

डॉ.एस.एस.मोरे,
सदस्य, जिल्हा निवड समिती
तथा अधिष्ठाता, राजर्षी छत्रपती शाहू महाराज
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती
प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापुर

श्री.संजय शिंदे
अध्यक्ष, जिल्हा निवड समिती,
तथा प्रभारी जिल्हाधिकारी, कोल्हापुर